जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2017

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व रिलायन्स जिओ यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, बालसुब्रमण्यम अय्यर. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, अजित चौगुले, डॉ. मिलिंद जोशी, किशोर पाटील.

# विद्यापीठाचा रिलायन्स जिओशी सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना वाय-फाय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने रिलायन्स जिओशी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात हा सामंजस्य करार झाला. सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी व रिलायन्सतर्फे बालसुब्रमण्यम अय्यर यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले व इंटरनेट विभाग समन्वयक डॉ. मिलिंद जोशी, किशोर पाटील उपस्थित होते.

सामंजस्य करारानुसार रिलायन्स जिओतर्फे विद्यापीठाच्या प्रांगणात वाय-फाय सुविधा माफक दरात उपलब्ध होणार आहे. उपकरणे व देखभालीचा खर्च रिलायन्स जिओ करणार आहे. विद्यापीठ वर्धापन दिनादिवशी ही सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्यात येत आहे.

सध्या विद्यापीठाशी संलग्नित १६२ महाविद्यालयांत रिलायन्स जिओतर्फे वाय-फाय सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे ही सर्व महाविद्यालये विद्यापीठास जोडली जातील. विद्यापीठासह महाविद्यालयांत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे प्रक्षेपण जिओ सेवेद्वारे करता येणे शक्य होणार आहे. जिओ चॅट सेवेद्वारे दृश्य (व्हिडीओ) संपर्क साधणे सुलभ होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2017
तरुण भारत

# विद्यापीठाचा रिलायन्स जिओशी सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना वाय-फाय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने रिलायन्स जिओशी नुकताच सामंजस्य करार केला. रिलायन्स जिओतर्फे सामंजस्य करारावर बालसुब्रमण्यम अय्यर व विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वाक्षरी केली. हा करार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या सामंजस्य करारानुसार रिलायन्स जिओतर्फे विद्यापीठाच्या प्रांगणात वाय-फाय सुविधा माफक दरात उपलब्ध होणार आहे. उपकरणे व देखभालीचा खर्च रिलायन्स जिओ करणार आहे. विद्यापीठ वर्धापन दिनादिवशी ही सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्यात येत आहे. सध्या विद्यापीठाशी संलग्नीत १६२ महाविद्यालयांत रिलायन्स जिओतर्फे वाय-फाय सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे ही सर्व महाविद्यालये विद्यापीठास जोडली जातील. विद्यापीठासह महाविद्यालयांत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे प्रक्षेपण जिओ सेवेद्वारे करता येणार आहे.

तसेच, जिओ चॅट सेवेद्वारे दृश्य (व्हिडिओ) संपर्क साधणे सुलभ होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले व इंटरनेट विभाग समन्वयक डॉ. मिलिंद जोशी, रिलायन्सचे किशोर पाटील, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर उपस्थित होते.



कोल्हापूर : रिलायन्स जिओशी करारानंतर करारपत्र दाखवताना कुलगुरू डॉ. शिंदे, रिलायन्सचे बालसुब्रमण्यम अय्यर, किशोर पाटील, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर, लेखाधिकारी अजित चौगुले डॉ. मिलिंद जोशी, अलोक जत्राटकर.

8 SEP 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रांगणात सुविधा :** रिलायन्स जिओसमवेत करार; विविध कार्यक्रमांचे प्रक्षेपण शक्य

# शिवाजी विद्यापीठात 'वाय-फाय'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना वाय-फाय सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने रिलायन्स जिओसमवेत सामंजस्य करार केला. त्यामुळे विद्यापीठाच्या प्रांगणात वाय-फाय सुविधा माफक दरात उपलब्ध होणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि. १ सप्टेंबर) सामंजस्य करार झाला. करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी, तर रिलायन्सतर्फे अय्यर यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्रा-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले व इंटरनेट विभाग समन्वयक डॉ. मिलिंद जोशी, रिलायन्स जिओतर्फे बालसुब्रमण्यम अय्यर, किशोर पाटील उपस्थित होते.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाने रिलायन्स जिओसमवेत सामंजस्य करार केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, रिलायन्स जिओतर्फे बालसुब्रमण्यम अय्यर यांच्या प्रमुख उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी झाल्या. यावेळी किशोर पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, विलास नांदवडेकर, अजित चौगुले, मिलिंद जोशी, आदी उपस्थित होते.

या सामंजस्य करारानुसार रिलायन्स जिओतर्फे विद्यापीठाच्या प्रांगणात वाय-फाय सुविधा माफक दरात उपलब्ध होणार आहे. उपकरणे व देखभालीचा खर्च जिओ करणार आहे. विद्यापीठ वर्धापनदिनादिवशी ही सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्यात येत आहे. सध्या विद्यापीठाशी संलग्नित १६२ महाविद्यालयांत रिलायन्स जिओतर्फे वाय-फाय सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे ही सर्व महाविद्यालये 'विद्यापीठास जोडली जातील. विद्यापीठासह महाविद्यालयांत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे प्रक्षेपण जिओ सेवेद्वारे करता येणे शक्य होणार आहे. जिओ चॅट सेवेद्वारे दृश्य (व्हिडिओ) संपर्क साधणे सुलभ होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2017

पुढारी

# विद्यापीठात आजपासून मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमास सुरुवात

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ छत्रपती शाहू महाराज इतिहास अध्ययन केंद्राच्यावतीने दि. ८ ते १९ सप्टेंबर या कालावधीत मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कोणत्याही कालखंडाच्या इतिहास लेखनासाठी संदर्भ साधनांची आवश्यकता असते. त्यापैकी मोडी लिपी हे एक प्राथमिक साधन आहे. कोल्हापुरातील व इतर पुराभिलेखागारात असंख्य मोडी कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यांचा अभ्यास करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान आवश्यक आहे. या अनुषंगाने मोडी लिपीचा प्रसार व्हावा म्हणून अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. औरंगाबाद येथील मोडी तज्ज्ञ मच्छिंद्र चौधरी व केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप मार्गदर्शन करणार आहेत.

8 SEP 2017 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
जनसंपर्क कक्ष

# Certificate course in Modi script

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University's Chhatrapati Shahu Maharaj History study centre is offering a two-week certificate course on 'Modi lipi' a six century old script used to write Marathi.

The course, according to the university circular will commence on Friday, September 8 and end on September 19.

The course will be useful for history students and researchers working on documents from the Maratha era.

The course will give participants an exhaustive exposure to the script thorough lectures and practical work. Students will get to know more about the script and they will get a chance to read the documents from the Maratha era.

According to officials from Chhatrapati Shahu Maharaj History study centre, experts from various universities have been invited for the course.

"In the past, we have received good response for the course, from students and researchers. This year we are expecting a better response. The course is open for interested candidates such as students or researchers, at a nominal fee," added the official.

"Students with a valid identity card will be charged Rs 500 for the course, while the general public will be charged Rs 700. Considering the expertise available the fees is not much. People with a genuine interest in history should opt for it," said the official from the centre.

When asked about the timings for the course, the centre officials told **TOI** that the course will be conducted from 3.30 pm to 5.30 pm.

The official added that for further details, interested candidates may contact course coordinator Nilambari Jagtap. For more information one can call— 0231-2606119 or 9604921457.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2017
तरुण भारत

# विद्यापीठात उद्यापासून मोडी लिपी वर्गाचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज इतिहास अध्ययन केंद्र यांच्यामार्फत शुक्रवार दि. ८ ते १९ सप्टेंबर या कालावधीमध्ये मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्ग सुरू होणार आहे. या अभ्यासक्रमामध्ये औरंगाबाद येथील मोडी लिपी तज्ज्ञ मच्छींद्र चौधरी व केंद्राच्या समन्वयक डॉ.नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी सर्व इतिहासप्रेमी, संशोधक, विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समन्वयक डॉ.नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

कोणत्याही कालखंडाच्या इतिहास लेखनासाठी संदर्भ साधनांची आवश्यकता असते. त्यापैकी मोडी लिपी हे एक प्राथमिक साधन आहे. 'कोल्हापूरातील व इतर पुराभिलेखागारात असंख्य मोडी कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यांचा अभ्यास करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान आवश्यक आहे.' इतिहासातील मूलभूत संशोधन करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान अनिवार्य आहे. मोडी लिपीचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा याकरिता या अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अभ्यासक्रमाच्या अधिक माहितीसाठी अध्यासन केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2017
तरुण भारत

# विद्यापीठात आज इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए. अधिविभागातर्फे शुक्रवार (दि. ८) रोजी इंडस्ट्रियल इन्स्टिटयूशन इंटरॅक्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहामध्ये या कार्यशाळेचे सकाळी ११ वाजता उद्घाटन होणार आहे. औद्योगिक संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या उच्च पदस्थ व्यक्तींशी विद्यार्थ्यांचा संवाद वाढविणे आणि विद्यार्थ्यांना व्यवसाय विषयक वस्तुस्थितीची जाणीव करून देणे हा या कार्यशाळेचा उद्देश आहे. शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ या वर्षीच्या कार्यशाळेत कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे उद्योजक आनंद माने, साऊंड कास्टिंगचे चेअरमन व्ही. एन. देशपांडे, मार्केटिंग व्यवस्थापक संजीव तुंगतकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत जागतिक अर्थव्यवस्था, त्यातील भारताचे स्थान व अर्थव्यवस्थेला सशक्त करण्यासाठी लागणाऱ्या उपाय योजनांची माहिती उपलब्ध होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2017
पुढारी

# विद्यापीठात आज इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन कार्यक्रम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ एम.बी.ए. अधिविभागाच्या वतीने दि. ८ सप्टेंबर रोजी इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शनचे मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. औद्योगिक संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या उच्चपदस्थ व्यक्तींशी विद्यार्थ्यांचा संवाद वाढविणे आणि विद्यार्थ्यांना व्यवसायविषयक वस्तुस्थितीची जाणीव करून देणे हा उद्देश आहे. शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ या वर्षीच्या इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन कार्यशाळेत कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे उद्योजक आनंद माने, साऊंड कास्टिंगचे चेअरमन व्ही. एन. देशपांडे, मार्केटिंग व्यवस्थापक संजीव तुंगतकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना जागतिक अर्थव्यवस्था, त्यातील भारताचे स्थान आणि भारतीय अर्थव्यवस्थेला सशक्त करण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांची माहिती उपलब्ध होणार आहे, अशी माहिती एम.बी.ए.अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी दिली.

8 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम. बी. ए. अधिविभागातर्फे इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या एम. बी. ए. अधिविभागातर्फे उद्या (ता. ८) इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन होत आहे. मानव्यशास्त्र इमारतीमधील सभागृहात त्याचे आयोजन केले आहे.

औद्योगिक संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या उच्च पदस्थ व्यक्तींशी विद्यार्थ्यांचा संवाद वाढविणे आणि विद्यार्थ्यांना व्यवसाय विषयक वस्तुस्थितीची जाणीव करून देणे हा कार्यक्रमाचा उद्देश आहे.

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे उद्योजक आनंद माने, साऊंड कास्टींगचे चेअरमन व्ही. एन. देशपांडे, मार्केटिंग व्यवस्थापक संजिव तुंगतकर यांना आमंत्रित केले आहे. विद्यार्थ्यांना जागतिक अर्थव्यवस्था, त्यातील भारताचे स्थान आणि भारतीय अर्थव्यवस्थेला सशक्त करण्यासाठी लागणाऱ्या उपाय योजनांची माहिती उपलब्ध होणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8 SEP 2017 लोकमत

# यंदा गारगोटीत मध्यवर्ती युवा महोत्सव

## शिवाजी विद्यापीठ : फलटणच्या मुधोजी महाविद्यालयातून गुरुवारी सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाविद्यालयीन युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे दरवर्षी युवा महोत्सव घेण्यात येतो. विद्यापीठाच्या ३७ व्या युवा महोत्सवाची सुरुवात यंदा फलटण (जि. सातारा)मधील मुधोजी महाविद्यालयातून दि. १४ सप्टेंबरपासून होणार आहे. गारगोटी येथील कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दि. २५ ते २७ सप्टेंबरदरम्यान मध्यवर्ती महोत्सव होईल.

जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती अशा दोन टप्प्यांत हा महोत्सव होईल. लोककला, लोकसंगीत, वाद्यवृंद, एकांकिका, लोकनृत्य, लघुनाटिका,



पथनाट्य, वक्तृत्व (मराठी, हिंदी व इंग्रजी), वादविवाद, प्रश्नमंजूषा, मूकनाट्य या स्पर्धा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात होतील. या स्पर्धांसह नकला, एकपात्री, शास्त्रीय सूरवाद्य, तालवाद्य, शास्त्रीय नृत्य, व्यंगचित्र, भित्तिचित्र, कोलाज, मातीकाम, रांगोळी, स्थळचित्रण, फोटोग्राफी, शास्त्रीय गायन, सुगम गायन, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य समूहगीत, भारतीय समूहगीत या स्पर्धा मध्यवर्ती महोत्सवामध्ये होणार आहे. पहिल्यांदा जिल्हा पातळीवरील महोत्सव होईल. यातील विविध स्पर्धांमधील पहिल्या तीन क्रमांकांचे विजेते मध्यवर्ती महोत्सवात सहभागी होतील.

### स्पर्धांची तयारी सुरु

महोत्सवातील स्पर्धांसाठीचे परीक्षक, संयोजन समितीची नियुक्ती, आदी स्वरुपातील तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मध्यवर्ती महोत्सवात यावर्षी विविध महाविद्यालयांतील साधारणत: १२०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होतील, असे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले. ते म्हणाले, जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील प्रश्नमंजूषा स्पर्धा रविवारी (दि. १०) दुपारी एक वाजता ज्या-त्या जिल्ह्याच्या ठिकाणी होणार आहेत. जिल्हास्तरीय महोत्सवात सांघिक, वैयक्तिक स्पर्धा होतील.

### सांगली, कोल्हापूरमधील महोत्सव

- दि. १६ सप्टेंबर : कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पलूस)
- दि. १८ सप्टेंबर : आर. बी. माडखोलकर महाविद्यालय (चंदगड)

# प्रतिसरकारचा अन्यायाविरुद्ध आवाज

## डॉ. अरुण भोसले : 'जी. डी. बापू लाड आत्मकथन' यावर कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : सर्वसामान्य ग्रामीण नागरिकांवरील अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्याचे कार्य प्रतिसरकारने केले, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र व जी. डी. बापू लाड प्रतिष्ठान (कुंडल) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जी. डी. बापू लाड आत्मकथन : एक संघर्ष यात्रा' विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. क्रांती उद्योग आणि शिक्षण समूहाचे प्रमुख अरुण लाड अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला.



डॉ. भोसले म्हणाले, "कर्जमुक्त करणे, अन्याय, अत्याचार आणि भय नाहीसे करणे म्हणजे स्वातंत्र्य ही जी. डी. बापूंची भूमिका सामान्य माणसाला भावली होती. साताऱ्याचे प्रतिसरकार हा एक गौरवशाली अध्याय होता. याचे सूत्रसंचालक जी. डी. बापू होते. गुंड टोळ्यांचा निपटारा करण्याचे काम प्रतिसरकारने केल्यामुळे जनतेचा विश्वास दृढ होत गेला. प्रतिसरकारच्या कार्यामधून समाधानाची भावना निर्माण झाली. मुतालिक सरदार जमिनीचे कब्जेदार होते. त्यांच्याकडून जमिनीचे फेरवाटप करून भूमी पीडितांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. तसेच, न्यायनिवाड्यासाठी क्रांतिकारी पंचायतीची स्थापना केली. प्रतिसरकारची एक खडी फौज असली पाहिजे, यासाठी त्यांनी कुंडलमध्ये प्रशिक्षण देऊन तुफान दल तयार केले."

ते म्हणाले, "भारतात चार-पाच ठिकाणी प्रतिसरकारांची स्थापना झाली. त्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रातील सातारा होते. पश्चिम बंगालमधील मिदनापूर येथील प्रतिसरकार दीड वर्षे टिकले. जी. डी. बापू यांना क्रांतिसिंह नाना पाटील यांचे मानसपुत्र म्हणता येईल. दोघांच्याही विचारांची नाळ घट्ट होती. तुफान सेनेचे फिल्ड मार्शल म्हणून जी. डी. बापू यांनी काम केले."

डॉ. नांदवडेकर यांनी जी. डी. बापू जसे परखड होते, तसे प्रांजळही होते, असे सांगितले. श्री. लाड म्हणाले, "१९४२ ची छोडो भारत ही चळवळ इस्लामपूर व तासगावमध्ये मोठ्या प्रमाणात झाली. या काळात जी. डी. बापूंनी स्वातंत्र्य लढ्यासाठी तुफान सैनिकांची शाळा उभी केली. सर्वसामान्य लोकांना समाजकंटकांचा त्रास होत होता. या समाजकंटकांना धडा शिकविण्याचे काम बापू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले." या वेळी प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, प्रसाद कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. केशव हरेल यांनी आभार मानले.

8 SEP 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिसरकारमुळे ग्रामीण लोकांवरील अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद

## डॉ. अरुण भोसले यांचे प्रतिपादन; विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांवरील अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्याचे कार्य प्रतिसरकारने केले, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि जी. डी. बापू लाड प्रतिष्ठान, कुंडल यांच्या संयुक्त विद्यमाने मानव्यशास्त्र इमारत सभागृहात आयोजित जी.डी.बापू लाड आत्मकथन : एक संघर्ष यात्रा या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. क्रांती उद्योग आणि शिक्षण समूहाचे प्रमुख अरुण लाड अध्यक्षस्थानी होते.

डॉ. अरुण भोसले म्हणाले, कर्जमुक्त करणे, अन्याय, अत्याचार आणि भय नाहीसा करणे म्हणजे स्वातंत्र्य ही जी.डी. बापूंची भूमिका सामान्य माणसाला भावली होती. साताऱ्याचे प्रतिसरकार हा एक गौरवशाली अध्याय होता. जी.डी. बापू लाड यांना क्रांतिसिंह नाना पाटील यांचे मानसपुत्र म्हणता येईल. दोघांच्याही विचारांची नाळ घट्ट होती. तुफान सेनेचे फिल्ड मार्शल म्हणून जी.डी.बापू लाड यांनी काम केले. बहुसंख्य खेडेगावांमध्ये ऐक्य प्रस्थापित करण्याचे काम बापूंनी केले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, जी.डी.बापू लाड जसे परखड होते, तसे प्रांजळही होते. सामान्य शेतकरी कुटुंबातील जी.डी.बापू यांनी केलेले कार्य आजच्या डिजिटल युगामधील तरुण पिढीला प्रेरणादायी आहे. अरुण लाड म्हणाले, १९४२ ची छोडो भारत ही चळवळ इस्लामपूर व तासगाव याठिकाणी मोठ्या प्रमाणात झाली. या काळात जी.डी. बापूंनी स्वातंत्र्य लढ्यासाठी तुफान सैनिकांची शाळा उभी केली. समाजकंटकांना धडा शिकविण्याचे कार्य बापू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केल्याने जनता सुखावून गेली. समाजासाठी, शेतकऱ्यांसाठी, उद्योग व्यवसायासाठी त्यांनी केलेले कार्य फार मोलाचे आहे. यावेळी प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, प्रसाद कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी अधिष्ठाता, विद्यार्थी उपस्थित होते. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. केशव हरेल यांनी आभार मानले.

8 SEP 2017

Times of India


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Ganeshotsav: SUK team finds 15% drop in noise levels

## But Cases Of Violations Across City

Piyush.Bhusari
@timesgroup.com

## NOISE READINGS ON TUESDAY



**Central Pollution Control Board Limits**

| Zone | Night Time |
| --- | --- |
| Silent | **40** db |
| Residential | **45** db |
| Commercial | **55** db |
| Industrial | **70** db |

| Silent Zone | Noise Level (db) |
| --- | --- |
| CPR Hospital Campus | 55.63 |
| Court area | 58.09 |
| Collector office | 56.24 |
| SUK | 46.36 |

| Residential Zone | |
| --- | --- |
| Rajarampuri | 49.13 |
| Uttareshwar peth | 66.24 |
| Shivaji peth | 50.96 |
| Mangalwar peth | 60.85 |
| Nagala park | 50.96 |
| Tarabai park | 48.24 |

| Commercial Zone | |
| --- | --- |
| Mirajkar tikti | 77.75 |
| Binkhambi mandir | 84.66 |
| Mahadwar road | 71.63 |
| Gujri | 74.92 |
| Papachi tikti | 82.73 |
| Rajarampuri | 63.72 |
| Laxmipuri | 72.52 |
| Shahupuri | 54.13 |

| Industrial Zone | |
| --- | --- |
| Udyamnagar | 55.62 |
| Y P Powar nagar | 54.33 |

*Source: SUK Department of Environmental Sciences*

**Kolhapur:** The Ganeshotsav celebrations this year did not witness use of high pitch sound systems but there were violations of noise level norms, revealed a report by the students of Shivaji University, Kolhapur.

The report says that noise levels were lower by 15% compared to previous years' celebrations. However, there were incidents of noise levels rising beyond the permissible limits in all the city areas, except the industrial zones.

The students and research scholars from the department of environmental sciences of the SUK had carried out the study on Tuesday 10pm to midnight to find out the intensity of noise.

P D Raut, head of the department of environmental sciences, told TOI, "In view of the 'no high decibel sound system scenario' in the city this year, we wanted to know whether the sound levels drop or remain as it was. We had covered various city areas with the six teams. Two students of each team monitored the areas with noise level meter and at fixed timings, a 10-minute reading was taken.

> In view of the 'no high decibel sound system scenario' in the city this year, we wanted to know whether the sound levels drop or remain as it was. We had covered various city areas with the six teams
>
> **P D Raut** | ENVIRONMENTAL SCIENCES, HOD

"We found that despite almost no use of sound systems, the noise levels were up, especially on the immersion procession route. However, it was heartening to see that overall the noise levels had dropped by 15%," he added.

Raut said 20 areas, such as the district collectorate office, Chhatrapati Pramila Raje Rugnalaya, Laxmipuri, Shahupuri, Nagala Park, Udyam nagar, Gujari and Mahadwar road, were monitored by the SUK teams during the activity. The students had categorised the monitoring into residential, silence, commercial and industrial zones.

He added, "This year the commercial areas on the procession route -- Mirajkar Tikati, Binkhambi mandir, Mahadwar road, Gujari and Papachi Tikti -- recorded noise levels well above 80 decibels, but lower than 95 db. Last year, noise levels at these areas had crossed 95 db.

In the residential zones, except Mangalwar Peth, all other areas such as Rajarampuri, Shivaji Peth, Nagala Park and Tarabai Park recorded noise levels below 60 decibel, which was low, but still above the permissible night-time limit of 45 decibel.

Raut said industrial areas Udyam nagar and Y P Powar nagar recorded noise levels at 55.62 decibels, and 54.33 decibels, respectively -- well below the permissible limit of 70 decibel set by the Central Pollution Control Board.

A city-based medical practitioner said that a continuous exposure to 80db to 90 db of sound for eight hours requires a rest period of at least 16 hours to recover from the damage done by the noise or there is always a chance of permanent hearing loss.

8 SEP 2017 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात विसर्जन काळात ध्वनिप्रदूषण पातळीत घट

## 'डॉल्बी'मुक्तीचा परिणाम

प्रतिनिधी, कोल्हापूर

**यंदाच्या गणेश** उत्सवात डॉल्बीचा दणदणाट नसल्याने ध्वनिप्रदूषणाच्या पातळी १५ टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे नेहमीप्रमाणे गणेश विसर्जन मिरवणुकीत कोल्हापूर शहरात ठिकठिकाणी ध्वनिप्रदूषणाच्या पातळीचे मापन केले. निर्धारित मर्यादेपेक्षा ही पातळी अधिक असली तरी डॉल्बीविरहित मिरवणुकांमुळे गतवर्षीपेक्षा ध्वनिप्रदूषणाची पातळी १५ टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवामध्ये २५ ऑगस्ट व ५ सप्टेंबर रोजी ध्वनी पातळी मोजण्यात आली. या मापनाकरिता ध्वनी मापन यंत्र वापरण्यात आले. सन २०१५, २०१६ व २०१७ या वर्षातील अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीच्यावेळी फक्त रात्रीच्या वेळेची ध्वनी पातळी पाहिल्यास असे दिसून येते की तीनही वर्षी ध्वनी पातळी वाढलेलीच आहे.

मात्र २०१७ च्या मिरवणुकीमध्ये बिनखांबी गणेश मंदिर व गंगावेश येथे ध्वनी पातळी थोड्या प्रमाणात वाढलेली दिसते पण इतर ठिकाणी ती प्रमाणात कमी असल्याची दिसून येते. या सर्व निरीक्षणावरून असे दिसून येते की यंदाच्यावर्षी ध्वनी पातळी केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या मानकापेक्षा वाढलेलीच आहे पण ती मागील वर्षीपेक्षा सरासरी १५ टक्क्याने कमी आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 SEP 2017
सकाळ

# 'विवेकानंद'मध्ये गिधाड जाणीव जागृती

कोल्हापूर, ता. ७ : विवेकानंद महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागातर्फे जागतिक गिधाड जाणीव जागृती दिवस साजरा झाला. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, ''गिधाडे ही पर्यावरणाचे सफाई कामगार असून पर्यावरण रक्षण करण्यासाठी त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.'' शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. ए. डी. जाधव यांनी २२ जातींची गिधाडे सापडतात, त्यांपैकी चार जाती भारतात असून त्यांचे जतन करणे गरजेचे असून शासनही याबाबत सतर्क आहे, असे सांगितले. डॉ. किरण शिंदे यांनी पर्यावरणातील बदलामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या जाती, तसेच त्यांच्या संवर्धनाविषयी उपाय सुचविले. प्रा. डॉ. टी. सी. गोपाले यांनी आभार मानले.